जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २६९ दिनांक :- २५/०९/२०२१

# एटीएम मधुन पैसे कादुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएमची अदलाबदली करुन फसवणुक करणारे आरोपीत यांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

-------00000-------

मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन एटीएम सेन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचालाखीने एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हयांना पायबंद घालणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने वरीष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारच्या पोलीस पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणात मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे- १) परवेझ अकबरअली शेख वय- ३१ वर्षे, रा- म्हारळ गांव, ता. कल्याण, जि. ठाणे २) शंकर रंगानाथ सुरडकर वय- ३७ वर्षे, रा- संत ज्ञानेश्वरनगर झोपडपट्टी, उल्हासनगर-२, जि. ठाणे यांना दिनांक १९/०९/२०२१ रोजी अटक केली आहे. अटक आरोपीत यांनी त्यांचे साथीदाराचे मदतीने सदरचे गुन्हे केले असल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. सदरचे गुन्हे करण्यासाठी आरोपीत यांनी वापरलेली इर्टिगा गाडी क्रमांक एम.एच. ४६. एयु. ३९०४ व मोबाईल फोन असा एकुण ५,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नमुद अटक आरोपीत यांचेकडून खालील गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वालीव | ९९६/२०२१ | भा.दं.वि.सं. कलम ४२० |
| २ | वालीव | ९९८/२०२१ | भा.दं.वि.सं. कलम ४२० |
| ३ | नालासोपारा | ४०६/२०२१ | भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ |

नमुद आरोपीत यांचेवर महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणावर ए.टी.एम. अदलाबदली करुन फसवणुक करण्याबाबतचे गुन्हे दाखल आहेत. अटक आरोपीत यांना पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ९९८/२०२१ भा.द.वि.सं. कलम ४२० या गुन्हयात वालीव पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी वरष्ठिांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, उमेश भागवत, सफौ/ अनिल वेळे, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, शंकर शिंदे, सचिन घेरे, पोशि/ राकेश पवार, अश्विन पाटील सर्व नेम- गुन्हे शाखा, यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---ooo---